
ISSN No 2347-7075
Impact Factor- 7.328
Volume-2 Issue-4

# INTERNATIONAL JOURNAL of ADVANCE and APPLIED RESEARCH



**Publisher: P. R. Talekar**
Secretary,
Young Researcher Association
Kolhapur(M.S), India

Young Researcher Association

| | | |
|---|---|---|
| 18 | राजकीय पक्षाच्या बदलत्या भूमिकेत सोशल मीडियाचा परिणाम<br>प्रा. डॉ.दत्तात्रय मारुती काळेल | 64-66 |
| 19 | विनोबा भावे यांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान<br>प्रा. दत्तात्रय शंकर मांजरे, डॉ. सुशिल कुमार शिंदे | 67-69 |
| 20 | भारतीय लोकशाहीतील राजकीय संसूचनाचे बदलते स्वरूप<br>डॉ.प्रदीप महादेव जगताप | 70-73 |
| 21 | कृषी कायदा २०२०<br>डॉ. सचिन श्रीरंग चव्हाण | 74-76 |
| 22 | भारतीय संघराज्य : स्वरूप आणि आव्हाने<br>प्रा. सचिन ताराचंद धुर्वे, प्रा. अनिल देविदास मुडे | 77-79 |
| 23 | महिलांचा राजकारणातील सहभाग<br>प्रा श्रीमती संध्या जयसिंग माने | 80-82 |
| 24 | महाराष्ट्रीय मंडळाचे, चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय,पुणे यांचा शारीरिक शिक्षण यामधील योगदानाचा अभ्यास<br>डॉ.ढमाळ पंकज उत्तमराव | 83-85 |
| 25 | महाराष्ट्रातील सामाजिक कार्यकर्त्या सावित्रीबाई फुले<br>डॉ शर्मिला अशोक साबळे | 86-90 |
| 26 | भारतीय स्वातंत्र्य चळवळीत दक्षिण महाराष्ट्रातील स्त्रीयांचे योगदान<br>डॉ. हाजी नदाफ, डॉ. दिपक जाधव | 91-96 |
| 27 | युद्ध परिस्थिती आणि जागतिक अर्थव्यवस्था- एक अभ्यास<br>डॉ. सौ. वृषाली विश्वासराव पाटील | 97-102 |
| 28 | अध्ययन-अध्यापन संप्रेषणात चेतक बदल अध्यापन कौशल्याचे महत्त्व<br>डॉ. वंदना ए. लावंड, प्राचार्य डॉ. वंदना शि. नलवडे | 103-106 |
| 29 | समाज परिवर्तनात महिलांचे योगदान एक अभ्यास<br>डॉ. गंगासागर तुळसीदास चोले | 107-109 |
| 30 | महिला समाजसुधारक: अहिल्याबाई होळकर<br>डॉ. कन्नाडे एम. के. | 110-113 |
| 31 | सीएसआर ची समाज विकासातील भूमिका<br>सुकेशीनि संजय जोगदंड | 114-116 |
| 32 | भारतीय समाज सुधारणेत महिलांची भूमिका एक समाजशास्त्रीय अभ्यास<br>प्रा.हरिश्चंद्र व्यंकटराव चामे | 117-120 |
| 33 | भारतीय समाजसुधारणेमध्ये थोर समाजसुधारक भगिनी निवेदिता यांचे योगदान<br>डॉ.सुनंदा एकनाथराव आहेर | 121-123 |
| 34 | इतिहासकार, समाजशास्त्रज्ञ : डॉ. गेल ऑमव्हेट<br>प्रा.विनोद आखाडे | 124-126 |
| 35 | स्वातंत्र्य चळवळीतील राजर्षी शाहूंचे योगदान<br>Dr Dhiraj Suresh Shinde | 127-131 |

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue.4 Mar-Apr- 2022

# महिला समाजसुधारक: अहिल्याबाई होळकर

**डॉ. कन्नाडे एम. के.**
सहाय्यक प्राध्यापिका, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज,कोल्हापूर

**गोषवारा:**

कर्तुत्वाचा चारित्र्याचा आणि नेतृत्वाचा आदर्श ज्या श्रेष्ठ महिलेकडून घ्यावा ती श्रेष्ठ स्त्री म्हणजे अहिल्याबाई होळकर होय. महाराष्ट्रात ठिकठिकाणी अहिल्याबाईंच्या खुणा आहेत त्यांचे कार्य वेगवेगळया रुपात उभा आहे. औदार्याचे बीज पेरण्याचे फार मोठे कार्य त्यांनी केले. महाराष्ट्राच्या सामाजिक, धार्मिक, राजकीय जीवनावर अहिल्याबाईंचा फार मोठा ठसा उमटलेला दिसतो. आणि आज 280 वर्षानंतरही त्यांचे नाव घेतले जाते हेच त्यांच्या कर्तृत्वाचे फार मोठे गमक आहे. अहिल्याबाई होळकर यांना लोकमाता, पुण्यश्लोक, देवी, गंगाजळ निर्मळ या सगळया पदव्या लोकांनी अर्पण केल्या होत्या. आणि आजही या पदव्या लोकांच्या हृदयामध्ये टिकून आहेत. मातीवर, देशावर निष्ठा, बाणेदार वृत्ती, साधी रहाणी उच्च चारित्र्य हे त्यांचे विशेष होते. अहिल्याबाई कर्मयोग्याप्रमाणे आपले जीवन जगल्या. भल्याभल्यांना लाभली नाही अशी दूरदृष्टी त्यांना लाभली. त्यांचे विचार आजही समाजाला मार्गदर्शक ठरतील असेच आहेत. दक्षिण भारतातील प्रसिद्ध विद्वान इतिहास तज्ञ रावबहादुर, चिंतामणी, विनायक वैद्य यांनी अहिल्याबाई संबंधी लिहिले की अहिल्याबाई आपल्या अनेक सद्गुणांनी महाराष्ट्रातच नव्हे तर अखिल मानवजातीस भूषण झाली आहे. त्यांची बुद्धिमत्ता व्यापक होती. त्यांची धर्मशीलता इतकी उदात्त होती की, धर्माच्या आणि नीतिच्या प्रत्येक बाबतीत त्यांनी आपले नाव अजरामर करून ठेवले. त्यांचा दानधर्म इतका प्रचंड की तसा दानधर्म आजवर भारतात कोणी केला नाही. आपल्या राज्या खेरीज इतर राज्यातही प्रचंड वास्तू उभारणाऱ्या अहिल्याबाई याच एकमेव आहेत.

**प्रस्तावना:**

कर्तुत्वाचा चारित्र्याचा आणि नेतृत्वाचा आदर्श ज्या श्रेष्ठ महिलेकडून घ्यावा ती श्रेष्ठ स्त्री म्हणजे अहिल्याबाई होळकर होय. महाराष्ट्रात ठिकठिकाणी अहिल्याबाईंच्या खुणा आहेत त्यांचे कार्य वेगवेगळया रुपात उभा आहे. औदार्याचे बीज पेरण्याचे फार मोठे कार्य त्यांनी केले. महाराष्ट्राच्या सामाजिक, धार्मिक, राजकीय जीवनावर अहिल्याबाईंचा फार मोठा ठसा उमटलेला दिसतो. आणि आज 280 वर्षानंतरही त्यांचे नाव घेतले जाते हेच त्यांच्या कर्तृत्वाचे फार मोठे गमक आहे. अहिल्याबाई होळकर यांना लोकमाता, पुण्यश्लोक, देवी, गंगाजळ निर्मळ या सगळया पदव्या लोकांनी अर्पण केल्या होत्या. आणि आजही या पदव्या लोकांच्या हृदयामध्ये टिकून आहेत. मातीवर, देशावर निष्ठा, बाणेदार वृत्ती, साधी रहाणी उच्च चारित्र्य हे त्यांचे विशेष होते. अहिल्याबाई कर्मयोग्याप्रमाणे आपले जीवन जगल्या. भल्याभल्यांना लाभली नाही अशी दूरदृष्टी त्यांना लाभली. त्यांचे विचार आजही समाजाला मार्गदर्शक ठरतील असेच आहेत.

**शोध निबंधाचा उद्देश :**

1. अहिल्याबाईंच्या समाजसुधारणा विषयक कार्याचा आढावा घेणे.
2. आधुनिक समाज विकासात अहिल्याबाईंच्या धोरणाच्या योगदानाचा आढावा घेणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत अध्ययनासाठी विविध ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे या द्वितीयक सामुग्रीक आधार घेण्यात आला. बीड जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी गावांमध्ये अहिल्याबाईंचा जन्म झाला.१७३३ मध्ये मल्हारराव होळकर यांचे पुत्र खंडेराव यांच्याशी त्यांचा विवाह झाला. विवाह झाला तेव्हा अहिल्यावाईचे वय केवळ आठ वर्ष इतक होतं. मल्हाररावांनी तिच्यातलं तेच, हुशारी जाणून तिच्या शिक्षणासाठी गुरु नेमले. अहिल्याबाईंची बुद्धी प्रखर होती. असा उल्लेख आहे,की, दूध गटागटा प्यावे त्याप्रमाणे त्या ज्ञान पिऊन टाकीत होत्या. अहिल्याचे कसव, मुत्सद्देगिरी, कौशल्य, रणनीतीचे ज्ञान बघून सर्वजण चकित होत. मल्हाररावांचा उजवा हात म्हणजे अहिल्या. जे त्यांचा पुत्र करू शकत नव्हता ते सारं काम अहिल्याबाई करत होत्या. वडिलांचा आदर करणाऱ्या भारतीय संस्कृतीचे अहिल्याबाई म्हणजे मूर्तिमंत